ISSN 2249-894X Impact Factor : 3.1402 (UIF) Volume - 5 | Issue - 8 | May - 2016

Review Of Research





# "उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांचे सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी आधूनिक तंत्रज्ञानाची उपयोगिता-एक अभ्यास"

अर्चना रामभारती[१] , उज्वला के सदावर्ते[२]
[१] संशोधिका , स्वा.रा.ति.म.वि.नांदेड.
[२]मार्गदर्शक , अधिष्ठाता शिक्षणशास्त्र विभाग , स्वा.रा.ति.म.वि.नांदेड
प्राचार्या, विवेक वर्धिनी अध्यापिका महाविद्यालय, नांदेड.

**सारांश :**

उच्च माध्यमिक स्तरावरील ११ वी, १२ वी ही दोन वर्षे विद्यार्थ्यांच्या आयुष्याला वळण लावणारी महत्वपूर्ण वर्षे आहेत. या वयोगटातील विद्यार्थी हे आधिक प्रमाणात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करतांना दिसतात. सामाजिक बदल घडवून आणण्यात त्यांची वैयक्तीक मूल्ये सर्वप्रथम विकसीत झाली पाहिजे. त्यामध्ये स्वावलंबन, कर्तव्यदक्षता, श्रमनिष्ठा, विज्ञान निष्ठा, भूतदया, निर्भयता, खिलाडू वृत्ती, शिस्तप्रियता. सामाजिक परिवर्तन होणे म्हणजे त्यांच्यामध्ये सामाजिक मुल्यांची जोपासना होणे होय. सामाजिक मूल्यांमध्ये समता, बंधूभाव, सर्वधर्म समभाव, सहिष्णुता, न्यायप्रियता, सौजन्यशीलता, आदरभाव, मानवता, निसर्ग प्रेम, परस्पर सहकार्य यांचा समावेश होतो.

सध्याची पिढी या आधूनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे एकलकोंडी बनत आहे. त्यांची वाचनाची सवय कमी होत आहे. त्यांना एकमेंकाचा सहवास नकोसा वाटतो. ते सतत मोबाईल, इंटरनेट, चित्रपट, विविध वेबसाईटस् वरच व्यस्त असतात. त्यांना ह्या तंत्रज्ञानाचा समाजात सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी कशा पद्धतीने वापर केला पाहिजे यासाठी व्यवस्थीत मार्गदर्शन करणे आवश्यक आहे व त्या वयोगटातील विद्यार्थ्यांमध्ये सामाजिकपरिवर्तन घडवून आणण्यासाठी आधूनिक तंत्रज्ञानाची उपयोगिता काय आहे. ह्या विषयाची माहिती मिळवण्यासाठी हा लेख सादर करीत आहे.

आधूनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे समाजात सामाजिक परिवर्तन अतिशय उत्कृष्टरित्या घडून येते. हे सिद्ध करण्यासाठी हा लेख सादर करीत आहे.

## प्रस्तावना :

आजच्या युगात तंत्रविज्ञान हा शब्द अगदी सामान्यातील सामान्य व्यक्तीलाही परिचीत झालेला आहे. मानवी जीवनातील प्रत्येक क्षेत्रावर तंत्रविज्ञानाने आक्रमण केलेले आहे. शिक्षण हे तर मानवाने स्वतःच्या प्रगतीसाठी स्वतः निर्मिलेले

क्षेत्र मानवाची सांस्कृतीक व सामाजिक प्रगती त्याने घेतलेल्या व घेत असलेल्या शिक्षणावर अवलंबून असते. त्यामुळे शिक्षण क्षेत्र असो, सामाजिक क्षेत्र असो, राजकीय क्षेत्र असो हे तंत्रविज्ञानापासून बाजूला कसे राहणार ?

उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी म्हणजे ऐन तारुण्यावस्थेतील विद्यार्थी समूह. ह्या वयोगटातील विद्यार्थी हे नवनवीन गोष्टी / बाबी शिकण्यासाठी अतिशय उताविळ असतात. ते सतत पुस्तके वाचून वा इतर आधूनिक तंत्रज्ञानाच्या वापरामूळे समाजापासून दूर राहतात. त्यांना समाजातील घटना वा घडामोडी ह्या पासून ते अलिप्त रहातात. परंतु त्यांचा सामाजिक विकास होणे तेवढेच आवश्यक आहे. शाळेत वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करुन तेथे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील घटनांचे व्हिडीओ दाखविले पाहिजे. तसेच त्यामुळे त्यांच्यात सर्वधर्म समभावाची भावना निर्माण होईल, राष्ट्रीय एकात्मतेची भावना त्यांच्यात निर्माण होईल. विविध ऐतिहासिक चित्रपट, ऐतिहासिक पाठ्यांश नाट्यरुपाने त्यांना दाखविले पाहिजे. जेणे करुन त्यांच्या अंगभूत गुणांमध्ये वाढ दिसून येईल. एखाद्या शास्त्रज्ञाने केलेला प्रयोग, कलाकाराने सादर केलेली कलाकृती, नेत्यांनी केलेली भाषणे, क्रिडा पटूनी कौशल्याने खेळलेले खेळ किंवा तज्ञ शिक्षकांनी दिलेला पाठ इ. अत्यंत महत्वाचे उपक्रम व्हिडीओ कॅसेटवर विद्यार्थ्यांना दाखविणे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकमेकांविषयीचे प्रेमभावना, समानता तसेच खेळाडूवृत्ती, सर्वधर्म समभावतेचे भावना, विज्ञाननिष्ठा, ह्या सारख्या वैयक्तीक मुल्यांमध्ये वाढ झालेली दिसून येते.

## व्याख्या : सामाजिक परिवर्तन :-

१) डॉ.हॅरी जॉन्सन :

"समाज रचनेत घडून येणारा बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय."

२) किंग्जले डेव्हीस :

"सामाजिक संघटना व समाज यांची संरचना व त्यांच्या कार्यातील बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय."

३) गिलीन व गिलीन :

"समाजमान्य जीवन पद्धती बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय."

## उद्दीष्ट्ये :

उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांचे सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यास करणे.

सामाजिक परीवर्तन घडवून आणण्यासाठी आधूनिक तंत्रज्ञानाची उपयोगिता अभ्यासणे.

## संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे.

**संशोधन साधने :** मुलाखत, प्रश्नावली.

## आधुनिक तंत्रज्ञानाचे घटक / बाबी :

या घटकांमधील काही महत्वपूर्ण आधुनिक घटकांचा वापर केला. त्यामध्ये

१) दुरदर्शन

२) संगणक, इंटरनेट

३) टी.व्ही.

४) सी.डी. प्लेअर

५) टेप रेकॉर्डर

६) मोबाईल

७) वेब साईटस्

८) व्हीडीओ कॅमेरा

९) इलेक्ट्रॉनिक संदेश (E-mail)

## सामाजिक परिवर्तनाचे प्रकार :

शिक्षामुळे समाजिक विकास घडून येतो. उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांचा सामाजिक विकास हा समाजरचनेतील / प्रक्रियेतील कोणत्याही पैलुत फरक पडला तर सामाजिक बदल घडतो. सामाजिक बदलाचे तीन प्रकार असू शकतात.

**१) संबंधीत बदल :** पुढे होणारा विकास आधिच्या विकासावर अवलंबून असतो व तो विकास वरवर जाणाऱ्या रेषेने दाखविला जातो.

**२) दिशाभिन्नत्व बदल :**काही बाबतीत बदल वर जाणारा तर नंतर खाली येणारा उदा. आंतरराष्ट्रीय व्यापारातील तेजी-मंदी.

**३) लाट-सदृश्य बदल :** हा बदल दुसऱ्या प्रकारासारखा असला तरी त्या बदलात सतत विकास दिसून येत नाही तर लाटेप्रमाणे चढ उतार दिसून येतो. उदा.फॅशन्स,

## सार्वजनिक परिवर्तनाचे घटक :

**१) भौतिक घटक :** भुकंप, ज्वलामुखी, महापूर, वणवा ह्या घटकांमुळे घरादारांचा नाश होतो. माणसे बेघर होतात. त्यामुळे ते देशांतर करतात व त्यामुळे त्यांच्या जीवन पद्धतीत बदल होतो.

**२) राजकीय घटक :** राजकीय घडामोडीमुळे समाजिक बदल झालेले दिसतात. वेगवेगळे राजकीय पक्ष, पुढारी, चळवळी, हक्क व कर्तव्य ह्यांची जाणीव, स्थानिक, प्रादेशीक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय समस्यांचे वाढते ज्ञान या प्रक्रियेला 'राजकारणीकरण' म्हणता येईल.

**३) औद्योगिक घटक :** उद्योग धंद्याच्या वाढीमुळे औद्योगिक उपनगरे, शहरीकरण, मजूर संघटना यामुळे विविध प्रकारचे सामाजिक बदल घडून येतात. उदा.रा-संस्थांची वाढ, परिवहन सुविधा, बँक्स, नागरीक सुविधा.

**४) शास्त्रीय व तांत्रिक शोध :** ह्या शोधामुळे विकसित व विकसनशील देशात दूरगामी सामाजिक व नैतिक बदल झाले आहेत. रेडिओ, टी.व्ही, रेफ्रिजरेटर, मोटार, विमाने यासारखी प्रवासाची साधने, गृहोपयोगी छोटी यंत्रे यामुळे जीवन दृष्टी बदलली आहे. त्यातून सामाजिक विकास व औद्योगिक विकास घडून येतात.

**५) सामाजिक व सांस्कृतिक घटक :** नवनवीन वेषभूषा व केशभूषा, स्त्री मुक्ती आंदोलन, दलितोद्धार, चळवळ, सुधारणावादी चळवळी वगैरेंनी निरनिराळ्या दिशांनी सामाजिक बदल घडून येतात.

**६) आर्थिक घटक :** चलन-फुगवट, दारिद्र्य, हरितक्रांती, मध्यपूर्वेत काम करणाऱ्या भारतीयांनी स्वदेशी नातलगांना पाठविलेल्या मोठमोठ्या रकमा ह्यामुळे सामाजिक जीवनात व संबंधात लक्षणीय बदल होतो. पैसे खर्च करण्याची हाव वाढते, जीवनदृष्टी बदलते.

## सामाजिक परिवर्तनाच्या विविध प्रक्रिया :

**१) पाश्चात्यीकरण :** इंग्रजी शिक्षणामुळे युरोपीय संस्कृती व चालीरीती, जीवनपद्धती (विशेषतः ब्रिटिशांची) ह्याची दाट छाया भारतीय संस्कृती व जीवनपद्धतीवर पडली आहे. भारतीयांनी केवळ पाश्चात्यांची शिक्षणपद्धती, शास्त्रीय व तांत्रिक ज्ञान

स्विकारले असे नव्हे, तर अन्न, पोषाख, शिष्टाचार, गृहव्यवस्था, विवाहपद्धती मानोरंजन, सामाजिक नीतिमत्ता इत्यादी बाबतीत पाश्चात्यांचा प्रभाव पडला आहे.

२) **औद्योगीकरण :** औद्यगोगीकरणामुळे उद्योगधंदे निघतात, त्यांच्याभोवती विशिष्ट स्वरुपाच्या संस्था उभ्या रहातात. त्यामुळे सामाजिक बदल हटकून होतात. निरनिराळ्या संघटनांच्या वैषम्यामुळे हिंसक प्रकार, शैक्षणिक संस्थांची वाढ, राजकीय हक्कांची जाणीव, उदीम केंद्रे, परिवहन सुविधा, बँक्स, नागरिक सुविधा इत्यादी.

३) **शहरीकरण :** महानगरे, छोटी नगरे, उपनगरे ह्यांच्या वाढीमुळे बरेच सामाजिक बदल घडतात. औद्योगीक शहरे, व्यापारी केंद्रे, विद्येची माहेर घर, धार्मिक तेजोवल्याची शहरे, राजधान्या इ. उदयाला येतात. त्यांच्या वाढीस भूतकाळ व वर्तमान काळ सहाय्यकारक ठरतात.

४) **संस्कृतीकरण :** भारतात अनुसूचित जाती-जमाती बऱ्याच आहेत. त्यांनी शिक्षणाच्या संधी व सुविधा प्राप्त झाल्यामुळे त्यांची आर्थिक व सांस्कृतिक पातळी वाढते. ते लोक आपल्या समाजातील हीन दर्जा सोडून समाजातील उच्चवर्णीयाप्रमाणे राहू लागतात. अन्न, वेशभूषा, केशभूषा, शिष्टाचार इत्यादी बाबतीत ते उच्चवर्णीयांचे जाणीवपूर्वक अनुकरण करतात. उच्चवर्णीयाप्रमाणे दर्जा मिळावा म्हणून ते सतत प्रयत्न करतात.

५) **धर्मनिरपेक्षता :** सामाजातील ठोक ज्यांची धर्मनिष्ठा प्रखर असते ते इतर धार्मियांपासून दूर राहातात. स्वतःचे धार्मिक विधी व सण एकनिष्ठेने पाळतात. हा धर्ममूलक सामाजिक दुरावा आता अर्वाचित काळात कमी-कमी घेऊ लागला. त्याला कारण महणजे लोकशाही सरकार, शास्त्रीय व तांत्रिक शोध, जलद जागतिक दळणवळण, शिक्षण प्रसार इ. त्यामुळे धार्मिक तुटकपणा कमी होऊन सर्व धर्मांचे व पथांचे लोक एकत्र येऊन आपापले सण साजरे करतात. समाजातील विषमता कमी होऊन समाजातील विविध थर एकत्र येऊ लागले. याचा परिणाम म्हणजे धर्मनिरपेक्षता वाटूलागली. धर्मनिरपेक्षता म्हणजे अधार्मिकता नव्हे तर सर्वधर्म समभाव. हा भारताने सेक्यूलरचा अर्थ स्विकारला आहे.

६) **सामाजिक चलनशीलता :**सामाजिक चलनशीलता कोणत्याही दिशेने होऊ शकते पण समाजशास्त्रीय दृष्टीने महत्वाची म्हणजे उर्ध्वगामी आणि समस्तर चलन शीलता. ही चलन शीलता वैयक्तिक किंवा सांधिक असू शकते. **उर्ध्वगामी** चलनशीलता नोकरीत / पगारात बढती झाल्याचे दाखवने तर **समस्तर चलन** शीलता केवळ स्थान बदल दाखविले. त्यात सामाजिक व आर्थिक दर्जा सुधारलेला नसतो. ही उदाहरणे वैयक्तिक चलनशीलतेची होय.

ज्यावेळी एखाद्या गटाला किंवा जमातीला सर्वकष चलन शीलता लाभते त्यावेळी तिला '**सांधिक चलन** शीलता' म्हणतात. ज्यावेळी व्यक्तींना एखाद्याच्या वशिल्याच्या पुढाऱ्याला मदतीने चलनशीलता मिळते तेंव्हा त्याला '**पुरस्कृत चलन** शीलता' म्हणतात. या उलट स्पर्धात्मक चलनाशीलता ही व्यक्तींला किंवा गटाचा अविश्रांक कष्ट करुन स्पर्धात्मक परीक्षांतून / निवडीतून मिळवावी लागते.

७) **राजकारणीकरण :**आधुनिक काळात निरनिराळ्या राजकीय विचारप्रणाली प्रसार पावून रुजत आहेत. त्यामुळे त्या विचारप्रणालींनुसार वेगवेगळे राजकीय पक्ष, त्यांचे पुढारी, त्यांच्या चळवळी ह्यामुळे नागरिक हक्क व कर्तव्ये ह्यांची जाणीव किंवा स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय समस्यांचे वाढते ज्ञान ह्या सर्व प्रक्रियेला राजकारणीकरण म्हणता येईल.

८) **हिंदूसमाजीकरण :** हिंदूसमाज संरचनेत स्थान मिळावे म्हणून जनजाती-जमाती ची इच्छा असते व त्या दिशेने ते प्रयत्न करतात, हा हिंदूसमाजीकरणाचा अर्थ आहे. उदा.-भिल्ल जमातीची एक शाखा हिंदूसमाज संरचनेत समाविष्ट झाली आहे. त्यामुळे त्यांना वाटते की, आपल्या ला सामाजिक व सांस्कृतिक दर्जा लाभेल. पण त्यांची इच्छा पुरी होत नाही. एवढेच नव्हे तर हरिजनसुद्धा त्यांना दूर ठेवतात.

९) **भारतिथीकरण :** दक्षिण भारतातील व इतर ठिकाणच्या कॅथॅलिक चर्चेमध्ये भिक्षुणी (नन) भारतीय वेष घालतात. धार्मिक गीते व प्रार्थना भारतीय भाषांत भाषांतरीत केली जातात. हे सर्व बदल भारतीयीकरणाच्या प्रक्रियेला एक अंग आहे. भारतीय संस्कृती व भारतीयत्व यांच्याशी एकरुप होण्याची ही एक प्रक्रिया आहे.

८) **आधुनिकीकरण :** ब्रिटन, अमेरिका, रशिया, जपान ह्या सुधारलेल्या देशातील शिक्षण पद्धती, जीवनमुल्ये, उद्योगधंदे यांच्या धर्तीवर आपल्याकडे मानसिक व भौतिक बदल घडवून आणावयाचे प्रक्रियेला 'आधुनिकीकरण' म्हणता येईल. आधुनिकीकरणामुळे भारतीय जीवन समृद्ध हेतू व संस्कारित झाले पाहिजे, तरच सुधारलेल्या देशांच्या पंगतीत भारताला बसता येईल. थोडक्यात आधुनिकीकरण म्हणजे 'मानसिकतेतील' बदल होय.

शैक्षणिक तंत्रज्ञानविषयक घटकाचा वापर करुन सामाजिक परिवर्तन घडवून आणणे:

१) अंधश्रद्धा निर्मुलन प्रोढ शिक्षण, आरोग्य इ. बाबत विविध कार्यक्रम हे चित्रफितीद्वारे विद्यार्थ्यांना दाखवून जाणिवजागृती करता येते.

२) विविध आशयावर आधारीत नाट्यीकरण करुन आशयाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक समस्या विषयी जाणिवजागृती करता येते.

३) व्हिडिओ चित्रीकरणानंतर त्यामध्ये स्लार्डस्, ग्राफीक्स, ॲनिमेशन इ. साधनांचा उपयोग करुन विद्यार्थ्यांना विविध देशातील आर्थिक, सामाजिक, राजकीय घडामोडी विषयी माहिती त्यांना देऊ शकतो. त्यामुळे विश्वबंधुता ह्या सामाजिक घटकांचा विकास विद्यार्थ्यांमध्ये होण्यास मदत होते.

४) व्हिडिओ चित्रिकरणाद्वारे जगातील ऐतिहासिक, भौगोलीक, सामाजिक, सांस्कृतीक घटकांचे दर्शन आपण विद्यार्थ्यांना देऊ शकतो. यातून त्यांचा सामाजिक विकास होण्यास मदत होते.

५) भारतातील दुर्गम भागात व कोणत्याही ठिकाणी आकाशवाणीचे कार्यक्रम प्रसारीत होतात. समाजातील प्रत्येक घटकांचा विचार करुन कार्यक्रम बनविले जातात. या मध्ये बातम्या,

शेती संदर्भात, कामगारासाठी, औद्योगिक, धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय इ. क्षेत्राबाबत विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाचे दृढीकरण हे या तंत्राद्वारे प्रभावीपणे करु शकतो.

६) सामाजिक चलनशिलतेमुळे विद्यार्थ्यांमध्ये त्यांची बौद्धीक क्षमता वाढून जणू काही स्पर्धाच निर्माण झाली आहे. तर ह्या स्पर्धेच्या युगात तो स्पर्धात्मक परिक्षासाठी इंटरनेटचा वापर करुन स्वत: वेळ व पैसा वाचवून स्पर्धात्मक चलनशीलता मिळवू शकतो व त्याद्वारे विद्यार्थी स्वत:चा सामाजिक परीवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न करतो.

७) सामाजिक व शैक्षणिक चित्रपट विद्यार्थ्यांना दाखवून त्याच्यामध्ये धर्मनिरपेक्षतेविषयी जाणिवजागृती निर्माण करतो. उदा.पी.के., बंजरंगी/भाईजान, रोजा, बॉम्बे, क्रांतिवीर इत्यादी.

८) स्लाईड प्रोजेक्टरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या अनुभूती प्राप्त होऊन त्यांच्या ज्ञान-कक्षा विस्तारतात. यामध्ये भारतीय संगीत, नृत्य, शिल्प वेशभूषा, ऐतिहासिक स्थळे, प्राचीन हस्तकला. भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास. प्राचीन उद्योग इ. विविध विषयांच्या स्लाईडस् व त्यासंबंधीत टेप, कॅसेट्स यांचा समावेश असतो व ह्याद्वारे विद्यार्थ्यांचा सामाजिक व सांस्कृतिक विकास साधता येतो.

९) उर्ध्वगामी चलनशीलतेच्या विकासासाठी इ. लर्निंग हे तंत्र अतिशय उत्कृष्ठ ठरते. इ. लर्निंग मुळे विद्यार्थ्याला जागतिक संधी किंमतीनुसार निवडीचे स्वातंत्र्य, अभ्यासक्रम निवडीची सुविधा, उच्च धारणा क्षमता, लवचिकता, सहायोगनिर्मिती हे फायदे होतात व त्यातूनच विद्यार्थ्यांच्या अंगभूत गुणांच्या विकासाबरोबरच सामाजिक विकास होण्यास मदत होते.

१०) इ.लर्निंग मुळे जगभरातील विविध आधूनिक व तांत्रिक शोधाविषयी माहिती विद्यार्थी मिळवू शकतो व त्याद्वारे देशाच्या औद्योगिक व तांत्रिक विकासात भर पडण्यास मदत होते.

## समारोप :

अशा प्रकारे विद्यार्थ्यांच्या सामाजिक परीवर्तन घडवून आणण्यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचे विविध घटक हे अतिशय महत्वाची भूमिका पार पाडतात. हे वरील माहिती वरुन लक्षात येते.

## संदर्भ ग्रंथ सूची :

०१) डॉ.पी.एम.पाटील व डॉ.व्ही.पी.शिखरे (जाने २०११) शैक्षणिक तंत्रविज्ञान आणि माहिती तंत्रविज्ञान, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
०२) डॉ.न.रा.पारसनीस (मार्च १९९६), प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र, नूतन प्रकाशन, पुणे.
०३) डॉ.पारसनीस, न.रा.शिक्षणाची तात्त्विक आणि समाजशास्त्रीय भूमिका, नूतन प्रकाशन, पुणे (१९९७)
०४) मुळे श.शं. व उमाटे वि.तु., (१९९८) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, पुणे.